(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**प्रा.डॉ.रमेश पांडुरंग पोळ** प्रमुख, मराठी विभाग सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड. मोब. ९८५०८५६३३०

---

मानवतावादाची शिकवण जगाला देणाऱ्या अनेक थोर विभूतींपैकी एक महत्त्वपूर्ण विभूती म्हणजेच, क्रांतीसुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय इत्यादी तत्वांचा प्रसार करत भारतीय सामाजिक जीवनात त्यांनी बदल घडवून आणला. धर्म, जात, वर्ण इ.वर आधारित असणाऱ्या भारतीय समाजाचे, केवळ ज्ञानाच्या जोरावर परिवर्तन घडवून आणले. 'ज्ञान' हे माणसाच्या परिवर्तनाचे एकमेव साधन आहे, असा मंत्र त्यांनी नुसता सांगितला नाही, तर तो प्रत्यक्षात आणून, आपल्या लाखो वर्ष अन्याय अत्याचार गुलामी सहन करणाऱ्या समाजाला ज्ञानाचा, प्रकाशाचा एक नवीन मार्ग त्यांनी दाखवला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व. त्यांनी भारतीय समाजजीवनात स्वतःच्या आचरण, विचाराने स्वतःचे असे एक अढळस्थान निर्माण केले आहे. भारतीय जीवनातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी सर्व क्षेत्रात त्यांनी योगदान दिले. नुसते विचार मांडले नाहीत तर, ते विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी विविध पातळ्यांवर विविध संस्था स्थापन केल्या. भारतीय समाजामध्ये आज जी लोकशाही नांदत आहे, त्याचे सारे श्रेय 'राज्यघटना निर्मितीकार' बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जाते. ज्ञान हा एकच मार्ग व्यक्ती व समाजपरिवर्तनाचा सोपा मार्ग आहे हे प्रत्यक्ष कृतीने बाबासाहेबांनी दाखवून दिले. शिक्षणामुळे 'स्व' विकास तर साध्य होतोच, पण समाजविकासही करता येतो याचा आदर्श बाबासाहेबांनी घालून दिला. बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार पाहणे हे प्रस्तुत लेखाचे उद्दिष्ट आहे. त्यांनी सांगितलेली ज्ञानाची व्याख्या, शिक्षणाचे ध्येय, शिक्षणाचे वर्गीकरण, तत्वज्ञान, तरतुदी, कार्य इत्यादी सर्वच घटकांचा यात विचार केला जाणार आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे उच्चविद्याविभूषित होते. लंडन विद्यापीठातून त्यांनी अर्थशास्त्रातील सर्वोच्च पदवी घेतली, तर अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही पदवी घेतली. पाश्चात्य देशात अभ्यास करत असताना, भारतीय समाजरचनेत असणारी विषम व्यवस्था त्यांना सतत अस्वस्थ करीत होती. ही व्यवस्था परिवर्तन करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय, हे बाबासाहेबांना उमगले होते. शिक्षणाचा अर्थ सांगताना ते म्हणतात की,"जे व्यक्तीला भयमुक्त बनविते, ऐक्याचे धडे देते, स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देऊन त्यांच्या प्राप्तीसाठी व रक्षणासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा देते ते शिक्षण होय."[१] शिक्षणाविषयक आपली भूमिका या ठिकाणी आंबेडकरांनी नेमकेपणाने सांगितलेली आहे.

शिक्षण ही माणसाच्या जीवनाची परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे. शिक्षणाने माणूस घडतो. स्वउद्धार, सामाजिक परिवर्तन, नैतिकीकरण, सामाजिककरण, भौतिक प्रगती, शील, चारित्र्याचे संवर्धन करणे, करुणा, दया, क्षमा, शांती, इत्यादीची शिकवण देणे, ही शिक्षणाची ध्येय असावीत असे त्यांनी सांगितले. माणसाला शिक्षणाने भौतिक सुख संपन्नते बरोबर आध्यात्मिक उन्नती ही करता आली पाहिजे, तेच खरे शिक्षण होय.शिक्षण ही एक दुधारी तलवार आहे, ते वापरणा-यावर अवलंबून असते, की तो त्याचा वापर कसा करतो. विद्येचा परिणाम सकारात्मक होण्यासाठी विद्येला शील, चारित्र्य, करुणा, क्षमा, यांची जोड हवी, तरच मानवतावादाची उभारणी करता येईल. आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचारांवर बुद्ध, महात्मा फुले, व संत कबीर यांचा प्रभाव जाणवतो. ज्ञान व प्रज्ञा यांचा सुरेख संगम हा शिक्षणात व्हायला हवा ही त्यांची शिक्षण विषयक भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण अशीच आहे.

इ.स. १९२० ते १९५६ हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कृतीशी कार्यकाळ. याकाळात अस्पृश्य समाजात सर्वतोपरी परिवर्तन करण्यासाठी त्यांनी प्रत्येक बाजूने लढा दिला. संपूर्ण समाजाला एकाचवेळी परिवर्तनाच्या प्रवाहात आणण्याचा एकमेव व सहज सोपा मार्ग म्हणजेच शिक्षण हे त्यांनी जाणले होते. म्हणूनच आंबेडकरांनी शिक्षणाचे प्रार्थमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, विद्यापीठ्य, संशोधनात्मक पातळ्या असे वर्गीकरण केले. या प्रत्येक प्रवाहाचा टप्प्याटप्प्याने अत्यंत सूत्रबद्धपणे विचार मांडून, त्यानुसार विविध कायदे, सवलती, तरतुदी, त्यांनी करण्याचा प्रयत्न केला. आणि हे कायदे त्यांनी अनेक संघर्ष करून आमलात आणले. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षण हे 'राष्ट्रीय प्रगतीचा पाया' आहे असे ते म्हणतात. केवळ बाराखडी शिकवणे, हे शिक्षण नव्हे तर, त्यांना सुसंस्कृत करणे म्हणजे शिक्षण होय. प्राथमिक शिक्षणाने ज्ञानाच्या क्षेत्रात फक्त शिरकाव होईल, पण हे पुरेसे नाही. त्यासाठी माध्यमिक शिक्षणाची आवश्यकता आहे. यासंदर्भात आंबेडकर सांगतात की,"प्राथमिक शाळात साक्षरतेचे, तर माध्यमिक शाळांमध्ये उत्तम नागरिक घडवण्याचे धडे दिले जावेत. नागरिक घडवण्याचे कार्य शिक्षकच करू शकतात. जातीधर्माशी निगडित

असणाऱ्या मूल्यांऐवजी लोकशाहीला पोषक असणाऱ्या मूल्यांचे संस्कार शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर करण्याचे कार्य माध्यमिक स्तरावर उत्तम प्रकारे होऊ शकेल."[२]

उच्चमाध्यमिक, विद्यापीठीय, संशोधनात्मक, विज्ञान व तंत्रज्ञानविषयक शिक्षण इ. सर्वच शिक्षणासंबंधी त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण विचार प्रतिपादन केले आहेत. प्रत्येक शिक्षणाचे व्यक्तीच्या जडणघडणीवर होणारे परिणाम, त्यातून माणूस म्हणून घडणारा समाज, मानवतावादाची होत जाणारी उभारणी, या सर्वांचे सूक्ष्म विवेचन त्यांनी केले आहे. प्रत्येक समस्यांच्या मुळाशी अज्ञान आहे, आणि सर्वांग प्रगतीचा एकमेव मार्ग म्हणजे 'ज्ञानार्जन' होय. उच्चशिक्षण प्रणाली ही देशाला प्रगतीपथावर नेणारी एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. उच्चशिक्षणात महाविद्यालय विद्यापीठे यांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण असते. विद्यापीठ ध्येयधोरणे, विद्यापीठ शिक्षण यंत्रणेतील उणीव, परीक्षानुवर्ती विद्यापीठ, शिक्षणानुवर्ती विद्यापीठात परिवर्तित करणे, विद्यापीठ व समाज, विद्यापीठ व शासन यांचे परस्परसंबंध, विद्यापीठ शिक्षणाच्या प्रचार, प्रसारासाठी उपाययोजना इत्यादी अनेक घटकांचे अत्यंत विस्तृत असे विवेचन करून, उच्चशिक्षणाचे समाजनिर्मिती, राष्ट्रबांधणीत असणारे महत्त्व आंबेडकरांनी अधोरेखित केले आहे.

स्त्रीशिक्षणाविषयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. आपल्या लोकसंख्येचा अर्धा वाटा या स्त्रिया आहेत. स्त्री ही समाज जडणघडणीतील एक महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक मुलाच्या संगोपनात, जडणघडणीत स्त्रीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. म्हणून स्त्रीशिक्षणाचा आग्रह महात्मा फुल्यांप्रमाणे डॉ. आंबेडकरांनीही धरला होता. स्त्री शिक्षणाविषयक असणारा त्यांचा उदात्त दृष्टिकोन त्यांनी ४ ऑगस्ट १९३३ च्या न्यूयॉर्क मधून भारतात आपल्या वडिलांच्या मित्रांना शिवनाक गौनाक यांना लिहिलेल्या पत्रातून व्यक्त होतो. ते लिहितात की,"पालक मनात आणतील तर ते आपल्या मुलांचे भवितव्य साकारू शकतात. पण या तत्त्वांचा अंगीकार केला तर आणि त्यानुसार कृती केली तर आपणास चांगले दिवस येतील आणि प्रगतीपथावर आपली वाटचाल अधिक गतीने होईल. याकरता मुलांच्या शिक्षणासोबत आम्हाला मुलींच्या शिक्षणाचाही तेवढ्यात गंभीरतेने विचार करावा लागेल आणि त्यानुसार कृती करावी लागेल."[३] स्त्री शिक्षणाबरोबरच बाबासाहेबांनी सहशिक्षणाचा 'को-एज्युकेशन'ही पुरस्कार केला आहे. सहशिक्षणामुळे समाजाची प्रगती वेगाने होते असे त्यांचे मत होते.

शिक्षणाचा चौफेर विचार करताना बाबासाहेबांनी उत्तम शिक्षक, प्राध्यापक कसा असावा हेही नमूद केले आहे. शिक्षकाची नेमकी भूमिका सांगून उच्चस्तरावर काम करणाऱ्या प्राध्यापकाची ही भूमिका त्यांनी नेमकेपणाने प्रतिपादन केली आहे. शिक्षकांबद्दल ते सांगतात की, "जी व्यक्ती आपल्या पत्नी व मुलाबाळांपेक्षाही शिक्षणावर अधिक प्रेम करते तिला शिक्षणप्रेमी म्हणावे."[४] तर प्राध्यापकाबाबत ते लिहितात की, "प्राध्यापकांनी अध्यापन आणि अध्यापनात स्वतःला इतके गुंतून घ्यावे की आपल्या घराकडेही बघण्याची सवड त्यांना मिळू नये. त्याचप्रमाणे प्राध्यापक नुसता विद्वान असून चालत नाही, तर तो बहुश्रुत असला पाहिजे उत्साही असला पाहिजे आपला विषय अधिकाधिक माहिती पूर्ण व मनोरंजक करून शकेल अशी धमक त्याच्याकडे असली पाहिजे."[५]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नुसते उच्चप्रतीचे शिक्षणविषयक विचार, ध्येय प्रतिपादन केले नाही, तर शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी त्यांनी 'बहिष्कृत हितकरणी' सभेच्या माध्यमातून कार्य, कायदे करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण क्षेत्रात त्यांनी 'पीपल एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. तसेच सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालयांची स्थापना केली. शिक्षण हा प्रत्येकाचा अधिकार आहे हे सांगून भारतीय राज्यघटनेत शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कायदे केले. त्यांनी शिक्षणाविषयक विविध कार्यप्रणाली, कायदे यांचे सविस्तर विवेचन करून, प्रत्येक भारतीय नागरिकाला सुसंस्कृत, उत्तम, शीलवान चारित्र्यवान माणूस म्हणून जगण्याचा, एक उत्तम जीवनमान व्यक्तित करण्याचा हक्क दिला आहे. हे बाबासाहेबांनी भारतीय समाजावर पिढ्यानपिढ्या केलेले खूप मोठे ऋण आहे.

शिक्षणविषयक विचारांचे प्रतिपादन करत असताना गरीब, कष्टकरी, अस्पृश्य समाजात शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडचणी, समस्या याचेही विवेचन बाबासाहेबांनी केले. शिक्षणासाठी येणाऱ्या आर्थिक, शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्याची अडचण या सगळ्याचा विचार करून आंबेडकरांनी शासकीय वस्तीगृहे, अनुसूचित जाती जमातीसाठी फी माफीच्या विविध सवलती, मोफत तसेच मापक सवलतीत उच्चशिक्षण, तंत्रशिक्षण कायद्याचेशिक्षण, घेण्याची सुविधा, ग्रंथालयासंबंधी सविस्तर प्रतिपादन इत्यादी सर्वच घटकांचे सखोल विवेचन केले होते. 'बहिष्कृत भारत', 'जनता' इत्यादी वृत्तपत्रातून शिक्षणविषयक आपली चळवळ त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवली. बहिष्कृत हितकरणी सभेमार्फत १९२५ मध्ये सोलापूर येथे दलित मुलांसाठी मोफत वस्तीग्रह सुरू केले. सरकारी व खाजगी शिक्षणसंस्था बद्दल ही त्यांनी अतिशय नेमके विचार सांगितले आहेत. पीपल एज्युकेशन सोसायटीची स्थापना करताना त्या संस्थेची उद्दिष्टे निश्चित करताना ते सांगतात की, "या

शिक्षण संस्थेचे ध्येय केवळ शिक्षण देणे हे नाही, तर समाजातील निरक्षर दलित व पीडित वर्गातील अज्ञान दूर करणे, या वर्गात स्वाभिमान स्वावलंबन आत्मविश्वास निर्माण करून, त्यांना स्वतःचा उद्धार करण्यास सक्षम बनवणे हे आहे. बौद्धिक सामाजिक व नैतिक मूल्यांचे संगोपन संवर्धन व त्यांचे समाजात प्रचलन करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे."[६]

शिक्षण हे मानवी जीवनाचा खरा अर्थ समजण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. शिक्षणाने माणूस 'माणूस' म्हणून जगतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारांमध्ये आपणाला सर्वसामावेशकता जाणवते. त्यांचे विचार एका बाजूला तंत्रज्ञानाची कास धरतात, तर दुसऱ्या बाजूला शील, करुणा, क्षमा, चारित्र्य अध्यात्मिकता यांचे प्रतिपादन करतात, म्हणूनच आंबेडकरांचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान हे मानवतावादाचा, सहिष्णुतेचा पुरस्कार करणारे आहे. संपूर्ण समाजाला एका समान सूत्रात बांधण्यासाठी त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक असेच आहेत.

**संदर्भसूची**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर (विचार आणि चळवळ) प्रा.चंद्रकांत रघुनाथ खंडागळे, प्रसाद ग्राफिक्स सांगली प्रथम आवृत्ती सप्टेंबर २०२१ पान नं ८९
२) तत्रैव, पान नं ९५
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन चरित्र खंड १, चां.भ.खैरमोडे ,पान नं ६६
४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर (विचार आणि चळवळ), प्रा.चंद्रकांत रघुनाथ खंडागळे, उणी, पान नं ९७
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर writing and speeches vol .18 part 1
६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर (विचार आणि चळवळ), प्रा.चंद्रकांत रघुनाथ खंडागळे, उणी, पान नं ९७-९८